**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.11 No.1** **Sept-Oct 2023**

# सांगोला तालुक्याचे -भगीरथ डॉ गणपतराव देशमुख (आबासाहेब)

**Dr. Ghantewad.M.T[1], Mr.Wakade Ashok Kisan[2]**
[1]Research Guide, Dept.of Political Science, V.K.M. Solapur
[2]SET, Political Science
**Corresponding Author – Mr. Wakade Ashok Kisan**
**E-mail** - ashokwakade23@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.10043033**

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र राज्याची निर्मिती 1 मे 1960 रोजी झाली त्याअगोदर महाराष्ट्राचा फारसा विकास झालेला नव्हता महाराष्ट्र राज्याचा बरासा भाग हा दुष्काळी, निरक्षर,बेरोजगारी,दळणवळणची साधन नसणारा दुर्गम होता.महाराष्ट्राच्या विकासाला चालना देण्यासाठी शेतीला मोठ्या प्रमाणात प्राधान्य दिले पाहिजे .शेतीला हक्काचे पाणी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान जैविक शेती सरकारचे अनुदान मोठ्या प्रमाणात मिळाले पाहिजे. त्याचबरोबर ज्या घटकांना अनुदान पोहोचवण्यासाठी सरकारचे अंमलबजावणी करणारी यंत्रणा महत्त्वाचे असते ती सक्षम असणं गरजेचे आहे. महाराष्ट्र राज्याच्या विकासामध्ये अनेक दिग्गज थोर राजकारणी,समाज सुधारकांचे, शिक्षण तज्ञांचे योगदान आहे. महाराष्ट्राचा विकास हवा असेल तर तेथील शेतकऱ्यांनी पावसाच्या पाण्यावर अवलंबून न राहता पाणी साठवून ठेवून शेती केली पाहिजे. ज्या भागांमध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो त्या भागातील पाणी दुष्काळग्रस्त पट्ट्यामध्ये वळवले पाहिजे व शेतीला पाणी मिळवून दिले पाहिजे .त्याचबरोबर शेतीला जोडधंदा म्हणून मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे उभे केले पाहिजे. उदा. शेळीपालन, कुकूटपालन .शिवाराला पाणी मिळाले तर शेती फुलेल आणि देश अन्नधान्य बाबी बाबतीत स्वयंपूर्ण होईल हे ओळखून सांगोला तालुक्यामध्ये जलक्रांतीचे महामेरू शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई गणपतराव देशमुख यांनी उभ्या आयुष्यामध्ये शेतीसाठी पाणी व दुष्काळग्रस्त भागांसाठी काम केले कुटुंबामध्ये कोणताही राजकीय वारसा नसताना राजकारणामध्ये शून्यातून विश्व निर्माण केले, एकाच पक्षांमध्ये, एकाच मतदारसंघांमध्ये, एकाच झेंड्याखाली, लोकप्रतिनिधित्व करण्याचे भाग्य भाई गणपतराव देशमुख यांना लाभले .1962 ते 2019 यापर्यंत भाई गणपतराव देशमुख यांनी सांगोला विधानसभा मतदारसंघांमध्ये लोकप्रतिनिधित्व केले. 1962 ते 2019 पर्यंत दोन अपवाद वगळता त्यांनी सर्व मुख्यमंत्र्यांबरोबर काम केले आहे. त्यांचं अनेक पक्षाबरोबर सलोख्याचे संबंध होते ,सांगोला तालुक्यामध्ये सामाजिक, आर्थिक ,धार्मिक ऐक्य राखण्याचे काम भाई गणपतराव देशमुख यांनी मोठ्या प्रमाणामध्ये केले.त्यांनी कधी जातीय राजकारणाला थारा दिला नाही, समाजातील सर्व स्तरांना एकत्र घेऊन त्यांनी राजकारण केलं

**उद्देश:**

1) गणपतरावजी देशमुख यांचा दुष्काळग्रस्त भागातील योजनांचा अभ्यास करणे.

2) कायमचा दुष्काळ हटविण्यासाठी गणपतरावजी देशमुख यांचे जलसिंचन विषयक विचार अभ्यासणे .

3) महाराष्ट्रातील विविध पाण्याची स्रोत धरणे यांची माहिती घेणे.

4) दुष्काळग्रस्त भागांसाठी पाण्यांच्या योजनांचा अभ्यास करणे उदाहरणार्थ टेंभू - म्हैसाळ योजना .

5) सिंचन क्षेत्रात ची वाढ करणे व विकास करणे यासंदर्भात सविस्तर अभ्यास करणे.

निसर्गाने पाणी हे जे महादान दिले आहे. ही मानवी जीवनाची, प्रत्येक प्राणिमात्रांची व शेतीची अत्यंतिक गरज आहे. परंतु दुष्काळी भागात आजही पिण्याचे पाणी मिळत नाही, हे वास्तव आहे. लोकांचा पाण्यावरील हक्क व पाणी ही संपत्ती सामूहिक मानण्याविषयी जाणीव जागृती करण्यासाठी पाणी चळवळीला जन्म घ्यावा लागला. कारण बहुसंख्य प्रजेला पाणी प्रश्नाचा आजही सामना करावा लागत आहे. भारत हा कृषिप्रधान देश असून सुमारे 65 टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. आणि शेती पावसावरच निर्भर आहे. मात्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही शेती क्षेत्राला पाण्याची सुविधा येथील राज्यकर्ते देऊ शकले नाहीत, हे नाकारता येत नाही. महाराष्ट्र भौगोलिक दृष्ट्या

पर्जन्यमानाच्या दृष्टीने असमानतेचे प्रदेश आहेत. उदा. माणदेश समुद्रसपाटीपासून उंचावर असल्याने या प्रदेशात सरासरी इतके पर्जन्यमान होत नाही. त्यामुळे येथील लोकांना हजारों वर्षांपासून दुष्काळाशी संघर्ष करत जीवन जगावे लागले आहे. 13 व्या शतकातील सतत 12 वर्षांचा दुर्गादेवीचा दुष्काळ, 14 व्या शतकातील दामाजी पंताच्या काळातील, 17 व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराज, संत तुकारामांच्या कालखंडातील, 1876 व 1896 या ब्रिटिशांच्या कालखंडातील दुष्काळाचा विचार करता पूर्णता निसर्गावर अवलंबून असलेला भाग (माण, खटाव खंडाळा, आटपाडी, सांगोला, मंगळवेढा, कवठेमहाकांळ, जत, तासगाव, कडेगाव, खनापूर) हे तालुके पिढ्यांनपिढ्या दुष्काळाचे केंद्रबिंदू आहेत. म्हणून ज्या प्रदेशात नैसर्गिकदृष्टीने पाणी उपलब्ध होत नाही. त्या प्रदेशाला विज्ञानाचा व विकसित झालेल्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून दुष्काळाचे निर्मूलन करता येईल. असा नवा दृष्टिकोन महाराष्ट्रात प्रथम सांगोल्याचे आमदार गणपतराव देशमुख यांनी ठेवून तत्कालीन खासदार क्रांतिसिंह नाना यांच्या अध्यक्षतेखाली 31 मे ,1961 रोजी 101 बैलगाडीतून पाणी जागृतीची मिरवणूक काढून सांगोला येथे पाणीपरिषद घेऊन सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरून दुष्काळी भागाला पाणी आणण्याची योजना मांडली. अढळ श्रध्दा, कमालीचा त्याग आणि चिकाटी असल्याखेरीज कोणतेही कठीण कार्य साध्य होत नसते हे पूर्णपणे ओळखून कोणत्याही उदात्त उद्दिष्टाने झपाटले जाणे, हेच जीवनाचे सार आहे. हे ध्येय अंगी बाळगून दुष्काळी भागाचे परिवर्तन करण्याचे व्रत त्यांनी दूरदृष्टी ठेंवून घेतले हे विशेष!

परिश्रम आणि त्रास सहन करण्याची तयारी व जिद्द हे तत्त्व स्वीकारून अत्यंत दुर्लभ गोष्टी प्राप्त करण्यासाठी दृढ निश्‍चयच महान कार्याचा जनक आहे. वादळाशी धैर्याने झुंजण्यात पुरुषार्थ आहे, जिवंतपणा आहे. म्हणून खरा सत्याग्रही कधीही पराभूत होत नाही. त्यांनी पाण्यासाठी केलेला संघर्ष व दुष्काळी भागाला आलेले पाणी हे अनेक तपांचे फळ आहे. पुढे 13 ऑगस्ट, 1977 साली तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखली नागज ,जि. सांगली येथे पाणी परिषद आयोजित करुन 1975 च्या कृष्णा पाणी तंटा लवादाने महाराष्ट्राला दिलेल्या पाण्याच्या प्रश्नाला शासनाने अग्रकम देऊन सातारा, सांगली व सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी तालुक्याला टेंभू व म्हैसाळ योजनेचे पाणी द्यावे ही मागणी करुन हा क्रांतिकारक निर्णय घेण्यास भाग पाडले. परंतु या प्रकल्पाची अंमलबजावणी गतीने होत नाही म्हणून कै.क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांना सोबत घेऊन राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून 26 जुलै, 1993 पासून 13 दुष्काळी तालुक्यांमधील जनतेला संघटित करून आटपाडी येथे पाणी संघर्ष चळवळीचे रणशिंग फुंकले. सातत्याने 27 पाणीपरिषदा घेऊन चळवळीचा लढा आजतागायत अव्याहतपणे सुरूच ठेवला आहे. जबाबदारीने व प्रामाणिकपणे काम करणे हाच सन्मानाचा मार्ग आहे.आंदोलनाला सुध्दा एक तर्कशास्त्र असते, ते त्यांना जमले म्हणून 30 जुलै, 1995 ची सांगोल्याची पाणी परिषद 26 ते 29 ऑक्टोबर, 1998 सालातील सतत 4 दिवसाचे सांगोला तहसील समोरील धरणे आंदोलन, 19 व 20 जानेवारी, 2004 पुणे येथे धरणे अंदोलन, 6- 7 मार्च, 2006 मुंबई येथील ठिय्या अंदोलन, 2002 चा नागपूर मोर्चा व सांगोला येथील वेळोवेळचे मोर्चे आदी जनचळवळीच्या जोरावर शिरभावी व 81 गावांच्या पिण्यासाठी पाणी योजना आणून प्रश्न सोडवला. टेंभू,म्हैसाळ, निरा उजवा कालवा या शेतीपूरक योजना पूर्णत्वास आज येत आहेत. याचे सारे श्रेय गणपतराव देशमुख यांच्या धडाडीच्या कार्यप्रणालीलाच! याविषयीचे एक वास्तव लोक ओवीगीतात म्हणतात,

**पंढरपुरीपाणीआणलं! आबासाहेबांनी घरात!**
**लावा तुळस बाई दारात ! टेंभू- म्हैसाळ योजनेचं पाणी !!**
**आलंय शेतीला ! लावा आबाच्या गाडीला घुंगरं जीतीला !!!**

हे लोकगीत म्हणजे त्यांच्या कार्याची साक्ष मनोमन देऊन त्यांना निवडणूकीत जिंकून आणू,असा ध्यास घेतलेली अनेक सामान्य माणसं गावोगावी पहावयास मिळतात. वैचारिक पायाखेरीज समाजात बदल होऊ शकत नाही. महान त्यागानेच महान कार्ये होतात.सांगोला तालुका हा अवर्षणप्रवण असल्यामुळे पाणी अडविले गेले पाहिजे, म्हणून गाव तेथे पाझर तलाव,नालाबडिंग,सिमेंट बंधारे, को. प. बंधारे बांधून भूर्गभातील पाणी पातळी वाढविण्यासाठी केलेला प्रयत्न हा जलसाक्षरतेचा उत्कृष्ट नमुना आहे. पाणी प्राप्तीसाठी केलेल्या प्रयत्नांचा आनंद स्वर्गाहून श्रेष्ठ आहे.पाणी मृगजळाप्रमाणे आणण्यात धन्यता मानणारे अन् त्याची तड लावण्यासाठी स्वत: चे जीवन समर्पित करणारे या दोहोंतील तफावत सुज्ञानी वैचारिकतेने अंगिकारावी. पाणीप्रश्नांसाठी सर्वसामान्य जनतेची नाळ जोडून व सर्वपक्षीय नेत्यांची मोट बांधून महाराष्ट्राचा सर्वांगीण

विकास,सामाजिक समतोल,राजकीय जागृती व आर्थिक सुधारणा घडवून दुष्काळी तालुक्याला एक नवा आयाम प्राप्त करुन देण्याचे काम फक्त गणपतराव देशमुख यांच्या कार्यक्षम नेतृत्वातच! पाण्यामुळे लढाई, पाण्यासाठी लढाई आणि पाणी वापरण्यासाठी लढाई हा विषय मानवाच्या केंद्रस्थानी आला आहे. म्हणून पाण्यासाठी आज प्रत्येक जन सज्ज झालेला आहे. पाणी हे विकासाचे संसाधन असा पाण्याकडे बघण्याचा आधुनिक दृष्टिकोन चळवळीमुळे सर्वत्र निर्माण झालेला आहे. याचे सारे श्रेय कै. नागन्नाथ अण्णा नायकवडी व गणपतरावजी देशमुख यांना द्यावे लागेल. शेती आणि पाणी याचे अतूट नाते आहे. पाणी ही निसर्गनिर्मित असूनही धरणाजवळील लोक पाण्यावर आपलीच मालकी आहे. असे समजून पाण्याचा वापर करीत आहेत. म्हणून पाणी चळवळीच्या रेट्यामुळे शासनाला 2005 साली समन्यायी पाणी वाटप कायदा करावा लागला. हे केवळ गणपतरावजी देशमुख आणि पाणीचळवळीमुळे शक्य झाले आहे, हे पाणी चळवळीचे फलित आहे.

55 वर्ष त्यांचे जनतेवर आणि जनतेचे त्यांच्यावर असलेले अविरत प्रेम अबाधित राहिले ,महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये सर्वात बुजुर्ग ,अनुभवी ,निस्वार्थी , अभ्यासू ,चारित्र्यसंपन्न आणि सर्व लोकप्रतिनिधींचे आदरणीय होते .सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्यापासून 2019 पर्यंतच्या दोन अपवाद वगळता सर्व मुख्यमंत्र्यांसोबत विधानसभेमध्ये काम करण्याचे मतभाग्य भाईंना लाभले. 55 वर्षाहून अधिक काळ राजकारणात ,समाजकारणात राहून लोकशाही प्रणाली पुरोगामी वैचारिक सदृढतेने जनतेचे प्रतिनिधित्व करून लोकशाहीचे मूलतत्वे तंतोतंत आचरणात आणणारे, महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतंत्र राजमुद्रा उमटवणारे ,सांगोल्याचे एकमेव कार्यक्षम ,विश्वविक्रमी करणारे आमदार होते, हरीकिशन सिंग सुरजीत ,ज्योती बासू यांच्या तोडीचा महाराष्ट्रातील एकमेव शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावान आमदार होते. आबासाहेब हे राजकारणातील एक अगळवेगळ विद्यापीठ होते, मार्क्स ,लेनिन यांच्या विचाराचा पगडा त्यांच्या ठायी असल्यामुळे एका उदात्त ध्येयासाठी तरुण वयातच त्यांनी जे ध्येय ठरवले होते, त्याबाबत त्यांच्या निष्ठा इतक्या स्पष्ट होत्या की दलित शेतकरी ,सामान्य माणसाला न्याय मिळवून द्यायचा असेल तर राज्य हे उपभोगाचे नसून ते जनतेच्या हितासाठी आहे. आणि ते कार्यक्षम चालवले पाहिजे हा क्रांतिकारक विचारांचा वसा घेऊन ,आपल्या कार्याची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली.आबासाहेबांनी आपल्या सामाजिक कार्याची सुरुवात बुद्धेहाळ, तालुका- सांगोला या तालुक्यातील तलावाखाली शेतकऱ्यांच्या 1600एकर जमीन आणि 250 घरे पाण्याखाली गेले होती, त्यांना न्याय मिळवून देताना आपल्या कार्याची सुरुवात त्यांनी केली ,तोच त्यांचा विश्वासू राजकारणाचा केंद्रबिंदू ठरला.एक सच्चा नेता म्हणून 1962 मध्ये त्यांनी शेकाप च्या वतीने सांगोला तालुका विधानसभा निवडणूक लढवली,आणि जिंकली सुद्धा.याविषयी ते स्वतः म्हणतात राजकारणात प्रवेशानंतर सुरुवातीपासून सरकारचा पैसा म्हणजे जनतेचा पैसा आहे, ही माझी धारणा राहिली आहे.जनतेने राजकारण्यांना अतिशय विश्वासाने निवडून दिलेले असते ,त्यामुळे जनतेच्या पैशाची उधळपट्टी करणे चुकीचे आहे, असे मी मानतो.त्यांनी विधानसभेमध्ये शेतकरी आत्महत्या, अपूर्ण सिंचन प्रकल्प ,रोजगार हमी योजना ,वीज पुरवठा, निराधार योजना, दलित वस्ती सुधारणा ,महिला सक्षमीकरण, सुशिक्षित बेरोजगार, याचबरोबर सांगोला तालुक्यातील पायाभूत सुविधा आणि राज्यांचे काही गंभीर प्रश्न यावर गंभीर्याने आपले मत मांडले आहे हे त्यांच्या विधानसभेतल्या वैचारिक उंचीवरून स्पष्ट होते. काही प्रसंगी त्यांनी शेतकऱ्यांच्या मागण्यासाठी धरणे उपोषण केले, आणि म्हणून अनेक लढे उभारताना महाराष्ट्र नाव घेतो ते स्वर्गीय आमदार भाई गणपतराव देशमुख आबासाहेब आणि शेकाप!ज्यांना भूतकाळाचा विसर पडतो ,त्यांना भविष्य काळ कधीही क्षमा करत नाही. याची जाणीव ठेवून प्रचंड संघर्षातून त्यांनी समाजकारणाची बांधणी केली. नुसतं यशस्वी माणूस असून चालत नाही तर मूलभूत नीतिमूल्य जपणारा माणूस असावा लागतो. सूर्योदय योजनेतील काम करणारे स्वर्गीय रामभाऊ वाघमोडे यांच्याशी ओळख झाली सदर योजना बंद पडल्याने खादी ग्रामोद्योग बोर्डात बदली झाल्याने नोकरीपेक्षा सामाजिक कार्य करून ते तत्व स्वीकारून संबंध तालुक्यात स्वतःची भाकरी घेऊन वाडी वस्तीवर फिरून त्यांनी माणसं जोडली, स्वर्गीय वसंतराव पाटील स्वर्गीय जगन्नाथ आण्णा लिगाडे, स्वर्गीय रामचंद्र गावडे आधी जीवापाड काम करणारी आणि प्रेम देणारी निष्ठावंत कार्यकर्ते त्यांना त्यांच्या राजकीय आयुष्यामध्ये मिळाली सामाजिक मूल्याचे भान त्यांनी ठेवून तळागाळापर्यंत जाऊन निष्ठेने काम केले, तेरा वेळा विधानसभा निवडणुका लढवून 11 वेळा निवडून येण्याचा विश्वविक्रम आबासाहेबांनी प्रस्थापित केला आहे, विधिमंडळ कामकाजामध्ये त्यांनी दोन वेळा मंत्रीपद भूषवले होते .आणि 1977 मध्ये विरोधी पक्ष नेतेपदी त्यांची निवड

झाली होती. त्यांनी महाराष्ट्र विधिमंडळाच्या अनेक समित्यावर काम केले आहे ,1978 मध्ये पुलोद सरकारमध्ये मंत्री असताना त्यांनी सरकारतर्फे येणारी वृत्तपत्रे वाचून आणि कात्रण काढून झाल्यावर राहिलेल्या रद्दीची रक्कम शासनाच्या तिजोरीमध्ये जमा करणारे महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातील एकमेव मंत्री असतील. समाजाचे पुढारी होण्यास विद्वत्तेबरोबरच सदाचार ,धर्मनिरपेक्षता,स्वार्थ त्याग, उद्योगप्रियता, प्रचंड बुद्धिमत्ता व सातत्य ठेवून कार्यकर्त्यांची व नव्या दृष्टीने डाळिंब ,बोर यामध्ये नाविन्यपूर्ण प्रकल्प हाती घेणारे ,पुरुष व महिला सूतगिरणी, दुग्ध संस्था ,बँक ,शैक्षणिक संस्था या माध्यमातून हजारो स्वावलंबी संसार त्यांनी उभे केले .दुष्काळी भागाचे विकास करण्यासाठी 21 मे 1961 रोजी 101 बैलगाड्यातून तात्कालीन खासदार क्रांतिसिंह नाना पाटील यांची मिरवणूक काढून सांगोल्यामध्ये पाणी परिषदा घेऊन ,सह्याद्रीच्या घाट्यावरून पडणारे पाणी दुष्काळी भागामध्ये आणण्यासाठी त्यांनी योजना मांडली ,आत्ता सांगोला तालुक्यामध्ये पाण्याची झालेली मुबलकता हे आबासाहेबांचे अनेक तपांचे फळ आहे .मार्च 2006 मध्ये मुंबईमध्ये त्यांनी आंदोलन केले होते, त्याचबरोबर हिवाळी अधिवेशन नागपूर येथे त्यांनी वेळोवेळी आंदोलन केले होते, सांगोला तहसील कार्यालयावर सांगोला तालुक्यातील जनतेच्या अनेक प्रश्न बाबत मोठ्या प्रमाणामध्ये मोर्चे काढलेले होते ,या मोर्चाचे चळवळींचे फळ म्हणजे शिरभावी व 81 गावाच्या पिण्याचे पाण्याची योजना आणून प्रश्न सोडवला, आणि तो सुद्धा महाराष्ट्रातील कायम स्वरूपात चालू असलेल्या योजना आपणाला पहावयास मिळते, हे विशेष बाब आहे. त्याचबरोबर टेंभू- म्हैसाळ योजना ,निरा उजवा कालवा या शेती पूरक योजना आज पूर्णत्वास येत आहेत, याचा सारे आबासाहेब आणि त्यांच्या धडाडीच्या कार्यप्रणालीलाच जाते. आज वैचारिक व पुरोगामी विचारांची परखड होत चालली आहे म्हणून अलीकडच्या नेत्यामुळे महाराष्ट्र हा मोठ्या प्रमाणामध्ये भ्रष्टाचाराला बळी पडत आहे, आणि महाराष्ट्राचे असणारी विकासाची खेळ बसत आहे.सध्याचे राजकारण हे व्यावसायिक बनले आहे परंतु सार्वजनिक जीवन नेहमी प्रभावी स्वच्छ ठेवल्याने त्यांना व्यवसायिक राजकारणाचा झळा जाणवल्या नाहीत .राजकीय तत्त्वज्ञानाच्या बदलत्या वावटळीत हरवून न जाता त्यांनी सामान्य माणसाला सदैव दैवत मानून सामाजिक काम केले .त्यामुळे ते प्रत्येकाच्या काळजात आजही घर करून राहिले आहेत.

पाण्यासाठी केलेल्या संघर्षातून मिळालेले पाणी हे अनेक तपाचे फळ आहे. पाणी वाटपातील विषमता दूर करून समतेच्या तत्त्वावर पाणी वाटप करण्यासाठी आबासाहेब नेहमी आग्रही राहिले. पिढ्यान्पिढ्या दुष्काळात जीवन जगणाऱ्या माणसांच्या जीवनात नवी जलक्रांती घडवून आणली. दुष्काळी भागातील पाण्यासाठीच अलीकडील काळातील जे अथक व पराकाष्ठेचे प्रयत्न केले, त्यामुळे त्यांना आधुनिक भगिरथ संबोधावे लागेल. विशेषत: सांगोला तालुक्यात सलग तीन-चार वर्षे दुष्काळ असतानाही पिण्याचे पाणी मात्र पंढरपूर येथून आणून शिरभावी योजनेतून सक्षमपणे पुरविले आहे. तालुक्यातील सर्व गावांना त्या योजनेचे पाणी सातत्याने मिळते. कारण जे शासनाने पाणीपट्टी ठरवून दिलेली आहे. पाणी घेणारी गावे नियमितपणे पाणीपट्टी भरतात. कोणतीही योजना राबवणे आणि ती जनतेच्या सहभागाने चालविणे हे आबासाहेबांच्या कृतिपूर्ण विचारांचा परिणाम आहे. इतकेच नव्हे तर टैंभू, म्हैसाळ योजनेचे पाणी अगोदर पैसे भरून शेतकऱ्यांना पाणी घ्ेण्याची जी सवय लावली आहे. असा जलनियोजनाचा, जलसाक्षरतेचा आणि जलक्रांतीचा नवा पांयडा त्यांनी जो घालून दिला आहे. तो आदर्श देशात, महाराष्ट्रात सर्वांनी आमलात आणला पाहिजे. मात्र हे फक्त अगोदर सांगोल्यातच घडले आहे. सांगोल्याच्या शिवारात पाणी आणून सर्वसामान्य व शेतकऱ्यांच्या डोळयातील अश्रू कमी करणारा महामानव म्हणून येथील जनता त्यांना मतांच्या ओंजळीत जपत आली आहे. आत्मकेंद्री आणि मतलबी राजकारण केले नाही. म्हणून कलुषित लोकमानस त्यांच्याविषयी तयार झालेला नाही. जनाधर मिळवून 55 वर्षे सातत्याने निवडून येणे सोपी गोष्ट राहिलेली नाही. मात्र जनताजर्नादन हेच सार्वभौम मानून त्यांच्या सेवासाधनेचे उपासक म्हणून त्यांनी काम केले. मान आणि इमान, नय आणि विनय, शक्ती आणि युक्ती, निष्ठा आणि प्रतिष्ठा, वक्तृत्व आणि कर्तृत्व यांचा पावनसंगम त्यांच्या ठिकाणी पाहावयास मिळतो.

**निष्कर्ष:**

शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते गणपतराव देशमुख यांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये फार मोठे योगदान आहे. भाई गणपतराव देशमुख यांनी सांगोला विधानसभा क्षेत्राचा सखोल अभ्यास करून कायमस्वरूपी दुष्काळ भाग हा शिक्का कसा मुजवता येईल यासाठी त्यांनी त्यांच्या उभ्या आयुष्यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये प्रयत्न केले. सांगोला तालुक्यासाठी सरकारच्या विविध योजना तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याचे कार्य भाई गणपतराव देशमुख यांनी मोठ्या प्रमाणामध्ये केलं.सांगोला

तालुक्याच्या दुष्काळा बरोबर विधानसभा क्षेत्रामध्ये कृषी उद्योग सूतगिरण्या सांगोला तालुक्यामध्ये डाळिंबासाठी मोठ्या प्रमाणामध्ये आवश्यक असणाऱ्या उपायोजना यासारखे काम त्यांनी केले .सांगोला तालुक्याचा पश्चिम भाग(कोळा ) भागांमध्ये कायमस्वरूपी पाणी देण्याच्या उद्देशाने टेंभू सारखी योजना त्यांनी सांगोला मतदारसंघांमध्ये आणली. सरकार दरबारी या दुष्काळीग्रस्त भागाचे लोकप्रतिनिधित्व त्यांनी मोठ्या जमाने केले शेतीसाठी पाणी पुरवण्यासाठी योजना निर्माण करून त्याचे अंमलबजावणी केली पाहिजे त्यासाठी शासन दरबारी मोठ्या प्रमाणामध्ये प्रयत्न केले, याचे यश म्हणजे म्हैसाळ - टेंभू सारखी योजना पाच नंबर फाट्याची योजना त्यांनी या तालुक्यामध्ये राबवलेल्या दिसून येतात.

**संदर्भसूची**


1. पाणीदार -डॉ. सुधीर भोंगळे.
2. कृष्णकाठ- यशवंतराव चव्हाण.
3. राजकारणातील मापदंड भाई गणपतराव देशमुख- डॉ.किसन माने.
4. ठाकूर किरण- संपा तरुण भारत (दिवाळी विशेषांक 2014) आम्ही विक्रमवीर पृ.क्रमांक 187.
5. माधवराव चितळे “पाणी आणि आपण” लोकराज्य ऑगस्ट 2011 पृ. क्रमांक 10.
6. ऍड. पृथ्वीराज चव्हाण “राजकारणातील शुभशक्ती” दैनिक तरुण भारत 10 ऑगस्ट 2011 पृ.क्रमांक 10.